ARTHA, Poona 4
Tel. 53627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80, Licence No. 173

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार ५ जून, १९६८ | अंक ११

आपल्या जिल्ह्यांतील शेतकी आणि औद्योगिक
विकास साधण्यासाठी

आ प ली ठे व

कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतच ठेवा.

कुलाबा जिल्हा मध्यवर्ती
सहकारी बँक लि.

मुख्य कचेरी—पेण

आपल्या २१ शाखांनिशी जनतेच्या
सेवेस सदैव तत्पर !

श्री. प. वि. म्हात्रे, बी. ए., एच. डी. सी.
मॅनेजर

श्री. ना. य. नेने
चेअरमन

## हिंदचे सामर्थ्यसंपन्न विमानदल

१९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या युद्धात भारतीय विमानदलाने उत्कृष्ट कामगिरी केली. त्यानंतर पाकिस्तानने आपल्या लष्करी सामर्थ्यात बरीच वाढ केलेली आहे. तरी सुद्धा १९६५ शी तुलना करता, भारतीय विमानदल आजही अधिक सामर्थ्यसंपन्न झालेले आहे. विमानांच्या हालचालींची माहिती देणारी अधिक चांगली रडार उपकरणे भारताजवळ आहेत. पाकिस्तानने फ्रान्सकडून काही विमाने घेतली असली तरी लढाऊ व बॉम्बफेकी अशा दोन्ही प्रकारच्या विमानांची भारताजवळील संख्याही उपेक्षणीय नाही. चीनकडून पाकिस्तानने रशिअन बनावटीची काही बॉम्बफेकी विमाने मिळविली आहेत. परंतु चीनच्या ह्या विमानांचा पाकिस्तानला फारसा चांगला अनुभव आलेला नाही अशा वार्ता आहेत. पाकिस्तानने आपली रडार यंत्रणा सुधारली असली तरी वैमानिकांचा तुटवडा मात्र त्या देशाला अजूनही जाणवत आहे. भारताने आपल्या विमानदलात अनेक देशांकडून घेतलेली निरनिराळ्या प्रकारची विमाने ठेवू नयेत असे काही तज्ज्ञांचे मत आहे. परंतु अशा पद्धतीच्या विमानदलाचेही काही फायदे असतात. भारतीय विमानदलात ब्रिटन, फ्रान्स व रशिआ ह्यांच्याकडून घेतलेली विमाने आहेत. आणीबाणीची वेळ आल्यास ह्यामुळे सुटे भाग मिळण्यास अडचण पडत नाही. एकाच देशाची विमाने असल्यास आणि त्यांचे भाग काहीही कारणाने न मिळाल्यास विमानदळ निकामी होण्याचा धोका असतो. विमानदलाला लागणाऱ्या विविध प्रकारच्या दारूगोळ्याच्या बाबतीतही भारताने चांगली प्रगती केली आहे. विमानदलाला खरा धोका अनपेक्षित हल्ल्यामुळे तळावरच गारद होण्याचा असतो, ह्याची जाणीव सर्वच विमानदल-प्रमुखांना असते.


---

## दांडेकर बंधूंची नांगरांची निर्यात

दांडेकर बंधू, सांगली, ह्यांनीं भारत सरकारच्या निर्यात मोहिमेनुसार आफ्रिकन टाईप नांगरांची निर्यात करण्यास प्रारंभ केला आहे. त्यांच्या सुरुवातीच्या दोन पेट्यांच्या रवानगीचा शुभारंभ दि. ११ मे, १९६८ रोजी सायंकाळी ६ वाजता डेप्युटी इंडस्ट्रीज कमिशनर, कॅप्टन देसाई, ह्यांच्या हस्ते समारंभाने साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी सांगलीतील छोट्या उद्योगधंद्यांचे बरेच प्रतिनिधी उपस्थित होते. कारखान्याचे ज्येष्ठ पार्टनर श्री. बाबुराव (ग. का.) दांडेकर ह्यांनी उपस्थितांचे स्वागत करून "फार फायद्याची अपेक्षा न करता, प्रसंगी थोडी घस सोसूनही, आमच्या नांगरांना परदेशी बाजारपेठ मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत" असे सांगितले. शीत पेय व पानसुपारी होऊन हा छोटासा समारंभ संपला.

---

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'
किंमत ५० पैसे.

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठीं
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे....
कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारीं अशीं ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यांस उपयुक्त आहेत.
किर्लोस्कर एंजिनें चालविण्यांस लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चांच्या मानानें फारच कमी येतो.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत).

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ५ जून, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र*


## हिंदी बँकिंगच्या १९६७ मधील प्रगतीची दिशा

### वर्षअखेर आशादायक वातावरण

रिझर्व्ह बँकेच्या ह्या ताज्या प्रकाशनात १९६७ मधील बँकिंगची दिशा आणि कर्जविषयक धोरणाची अंमलबजावणी ह्यांचा आढावा घेण्यात आला आहे. १९६५-६६ मध्ये शेतीच्या उत्पादनात प्रचंड घट झाली होती, आणि १९६६-६७ मध्ये विशेष सुधारणा आढळून आली नाही. औद्योगिक उत्पादन-वाढही २·६% वरून १·४% वर घसरली. इकडे चलन आणि पतपुरवठा ह्यांत मात्र वाढ होत राहिली; साहजिकच महागाई वाढत गेली. १९६७ अखेर मात्र, शेतीच्या उत्पादनातील वाढी-मुळे आशादायक वातावरण निर्माण झाले. शेती, निर्गत आणि लघुउद्योग ह्यांस कर्जपुरवठा अधिक होण्याकडे लक्ष पुरविण्यास आता प्रारंभ झाला आहे.

### शेतीच्या उत्पादनवाढीमुळे महागाईस आळा

१९६७-६८ चा हंगाम सुरू झाला, तेव्हा अन्नधान्य आणि तेलबिया ह्यांच्या उत्पादनातील वाढीमुळे किंमतवाढीस आळा बसला. ऑक्टोबर १९६७ ते फेब्रुवारी १९६८ ह्या मुदतीत घाऊक किंमतींचा निर्देशांक ८% ने खाली आला; बँकेचा मोसमी कर्जपुरवठा (अन्नधान्य खरेदी वगळून) पूर्वीच्या वर्षी ३२३ कोटी रु. होता, तो आता २५१ कोटी रु. एवढा पुरला. परंतु, काही प्रकारच्या कारखान्यांना मंदीचा अनुभव येऊ लागून, त्यांना आर्थिक टॉनिकची आवश्यकता निर्माण झाली. ह्यासाठी बँक रेट ६% वरून ५% वर उतरविण्यात आला; बँकांचे ठेवी-वरील आणि कर्जावरील व्याजाचे दरही उतरविण्यात आले. बँकांचे सामाजिक नियंत्रण व त्यासाठी कायदेशीर उपाययोजना, ही ह्या वर्षातील फार दूरगामी महत्त्वाची घटना आहे. त्याविषयी माहिती 'अर्था'मध्ये ह्यापूर्वी येऊन गेलेलीच आहे.

### शेड्यूल्ड, बिगर-शेड्यूल्ड आणि लायसेन्स्ड बँका

१९६७ अखेर व्यापारी बँकांची संख्या ९० होती, त्यांपैकी ७१ शेड्यूल्ड बँका होत्या. लायसेन्सधारी बँकांची संख्या ५७ (शेड्यूल्ड ५१ आणि बिगर-शेड्यूल्ड ६) होती. म्हणजे, शेड्यूल्ड बँकांपैकी २० बँका अद्याप लायसेन्सपात्र ठरलेल्या नाहीत. स्टेट बँक आणि तिच्या दुय्यम बँका ह्यांना लायसेन्सची आवश्यकता नाही, त्या आणि लायसेन्सधारी बँका ह्यांचेकडे मिळून एकूण ठेवींपैकी ९८% ठेवी होत्या. १९६७ मध्ये व्यापारी बँकांनी एकूण ४०५ नवीन शाखा उघडल्या, त्यांपैकी १८२ शाखा पूर्वी एकही बँक कचेरी नव्हती अशा ठिकाणी उघडण्यात आल्या. आता शेड्यूल्ड बँकांच्या ६,८१६ आणि बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या २०९ कचेऱ्या आहेत; पूर्वीच्या वर्षअखेर त्यांची संख्या अनुक्रमे ६,४१६ आणि २२१ होती.

### सहकारी बँकांच्या ठेवी व पतपुरवठा

१९६७ अखेर २९ शिखर सहकारी बँका, ३६७ मध्यवर्ती सहकारी बँका आणि १,११७ प्राथमिक सहकारी बँका चालू होत्या. शिखर बँकांकडील ठेवी ८२·२ कोटी रु. च्या ८७·३ कोटी रु. झाल्या. मध्यवर्ती सहकारी बँकांच्या ठेवी २०५·९ कोटी रु. वरून २३४·२ कोटी रु. वर गेल्या. शेतीच्या मोसमी गरजा भागविण्यासाठी रिझर्व्ह बँकेने अल्प मुदतीची, सवलती-च्या दराची ३४९·७ कोटी रु. ची कर्जे १८ शिखर सहकारी बँकांना मंजूर केली. मध्यम मुदतीची, सवलतीच्या दराची १६·८३ कोटी रु. ची कर्जे दिली, ती वेगळीच.

### उद्योगधंद्यांच्या कर्जात सतत वाढ

१९६६–६७ मध्ये बँकांच्या कर्जपुरवठ्यात ३७० कोटी रु. ची वाढ झाली, त्यापैकी २७६ कोटी रु. (७४·७%) उद्योग-धंद्यांना मिळाले. त्यामुळे, त्यांचा एकूण कर्जपुरवठ्यातील वाटा ६२·७% चा ६४·३% झाला. उद्योगधंद्यांना १९५१ मध्ये एकूण कर्जापैकी फक्त ३४% कर्जे मिळत असत; १९६१ मध्ये हे प्रमाण ५०·८% वर गेले आणि १९६७ मध्ये ते ६४·३% वर पोचले. व्यापारी उलाढालींचा कर्जपुरवठा सतत कमी होत चालला आहे. शेती, मळे ह्यांचा कर्जपुरवठा (सहकारी क्षेत्र वगळून) १९६६–६७ मध्ये मामुली १० लक्ष रु. नी वाढला, पण एकूण कर्जपुरवठ्यातील त्याचे प्रमाण २·४% वरून २·१% वर उतरले.

### ग्रामीण भागांतील ठेवी वाढल्या

ग्रामीण भागांत बँकांच्या कचेऱ्या उघडल्यामुळे तेथील लोकांत बचतीच्या सवयीला प्रोत्साहन मिळाले आहे, असे रिझर्व्ह बँकेच्या पाहणीत आढळून आले आहे. १०,००० लोकवस्तीपेक्षा लहान केंद्रांतील ठेवी १९६० मध्ये ४८·६ कोटी रु. होत्या त्या आता ८१·१ कोटी रु. झाल्या आहेत. ह्या मुदतीत सेव्हिंग्ज ठेवींत ६०%, मुदती ठेवींत १२९% आणि चालू ठेवींत ५१% वाढ झाली.

### परदेशीय भांडवलाला बिर्ला ह्यांचे आवाहन

इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सच्या इंडिअन नॅशनल कमिटीचे अध्यक्ष श्री. एल. एन. बिर्ला ह्यांनी परदेशीय भांडवलाला भारतात येण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणतात की हिंदची अर्थव्यवस्था सतत प्रगती करण्याच्या अवस्थेपर्यंत पोचलेली आहे. इतर अनेक देशांप्रमाणे भारतातही परदेशीय भांडवलाच्या गुंतवणुकीला चांगला वाव आहे. परदेशीय भांडवलदारांनी बँकांच्या व सर्वसाधारण विम्याच्या सामाजीकरणाच्या भाषेने बिचकून जाण्याचे कारण नाही. सामाजीकरण अथवा सामाजिक नियंत्रण म्हणजे राष्ट्रीयीकरण नव्हे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. भारतातील उद्योगधंद्यांना अनुकूल असे वातावरण उत्पन्न होण्याची पुष्कळ चिन्हे आता दिसू लागली आहेत. सरकारने नियंत्रणाची व्याप्ती कमी करण्याचे धोरण स्वीकारले आहे. अर्थव्यवस्थेचा विकास व्हावा म्हणून द्रव्यविषयक धोरणांत बदल करण्यात येत आहे. देशातील अन्नाचा प्रश्न पूर्वीइतका बिकट राहिलेला नाही. त्यामुळे औद्योगिक पुनरुज्जीवन होऊ लागण्याची लक्षणे दिसत आहेत. १९६८-६९ सालांत उद्योगधंद्यांच्या वाढीत निदान ५ टक्के सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे. एकूण देशांतर्गत परिस्थिती अर्थव्यवस्थेच्या जलद विकासाला अनुकूल अशी आहे. वाढीच्या प्रेरणेला कितपत प्रतिसाद मिळेल हे आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यातील अनुकूल तफावतींवर अवलंबून आहे. भारतासारख्या विकासशील देशातील आर्थिक विकास हा बऱ्याच प्रमाणात परदेशीय चलन किती प्रमाणात उपलब्ध होते त्यावर अवलंबून असतो. परदेशीय चलन नेहमीच्या व्यापारी मार्गाने अगर परदेशीय भांडवलाच्या गुंतवणुकीने उपलब्ध होत असते.

---

### भारत सरकारचे देणे १,५८,५९,००,००,००० रु.

मार्च, १९६८ अखेर भारत सरकारला एकूण ११,९५७ कोटी रुपयांचे कर्ज होते. मार्च, १९६७ अखेरच्या तुलनेने ते १,१२० कोटी रुपयांनी अधिक होते आणि मार्च, १९५१ असेरच्या तुलनेने तर ते सहापट होते.

१९५५-५६ नंतर सरकारच्या परदेशी कर्जात द्रुत गतीने वाढ होत आहे. १९५५-५६ मध्ये एकूण कर्जात परदेशी कर्ज १% पेक्षाही कमी होते; मार्च, १९६६ अखेर ते प्रमाण ३२% झाले. जून, १९६६ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे परदेशी कर्ज आपोआपच ५७.५% ने वाढले; साहजिकच परदेशी कर्जाचे प्रमाण ४५% वर गेले. अल्पबचत, रिझर्व्ह फंड, इत्यादी देणी लक्षात घेतली, तर मध्यवर्ती सरकारच्या देण्यांची रक्कम १५,८५१ कोटी रु. होते. मार्च, १९५१ अखेर ती फक्त ९,८९५ कोटी रु. होती. राष्ट्रीय उत्पन्नाशी ह्या देण्यांचे प्रमाण १९५०-५१ मध्ये ३०% होते, ते १९६६ मध्ये ६२% झाले. १९६८-६९ अखेर एकूण देणी १७,२९० कोटी रु. होतील.


## D. E. Society's
## Brihan Maharashtra College of Commerce Poona 4

The College will reopen on 15th June 1968 for the academic year 1968-69. In view of the limited accommodation admission to the B. Com. Part I, S. Y. B. Com. and T. Y. B. Com. Classes will be given in the first instance to the students of this College. Students from other colleges will be admitted only if some vacancies are available. The students of this College should take admission before 15-6-1968. Provision has been made to teach the following special subjects at T. Y. B. Com. :—Advanced Accounting and Auditing, Statistics, Advanced Banking, Industrial Management and Advanced Cost Accounting.

The programme of admission to the various classes will be as followes :—

| | |
|---|---|
| S. Y. & T. Y. B. Com :— | From 1st June onwards. |
| P. D. Commerce :— | From 6th June onwards. |
| F. Y. Commerce :— | From 13th June onwards. |
| M. Com. :— | From 17th June onwards. |

(M. Com. classes will begin from 1st July 1968).

Students of this college must bring their Identity card with them at the time of registering their names.

Students who are seeking admission to this college for the first time must bring with them Identity card-size photograph.

Students seeking admission to the P. D. Com. Class should bring with them the following along with the admission form :—

(1) S. S. C. Statement of Marks
(alongwith two typed copies of the same.)
(2) School Leaving Certificate
(3) Identity Card-size photograph

Forms of admission and copies of the prospectus will be available in the college office between 11 a. m. and 2 p. m. on all working days.

N. K. Kulkarni
*Principal*

Date : 22-5-1968
Poona 4.

---

## Fergusson College, Poona 4.

The college will reopen on the 15th June 1968. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examinations are declared.

Poona V. N. Dhavale
20th May 1968 Principal

## कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. पेण

# नव्या इमारतीचे उद्‌घाटन

कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्वतःची वास्तू उभारून आता प्रकट रूप धारण केले आहे. मुंबई-गोवा रोडवरून पेणकडे वळणारी प्रत्येक व्यक्ती हाच अनुभव घेते आणि मग कुलाबा जिल्ह्यातील समस्त जनतेस आपले स्वप्न साकार झाल्याचा प्रत्यय येतो. जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींची मान अभिमानाने उंचावते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडून जिल्ह्यातील या कार्यकर्त्यांनी सहकारी चळवळ उभारली आहे, तिला असे सुंदर स्वरूप प्राप्त झाल्याचे पाहून त्यांचा उत्साह वाढतो व जिद्द बळावते. आपल्या नवीन इमारतीच्या रूपाने जिल्ह्याचे भूमीला बँकेने एक सुंदर लेणे आता अर्पण केले आहे आणि जिल्ह्याची शान वाढविली आहे !

व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या जीवनात वास्तूच्या उभारणीस एक महत्त्वाचे स्थान आहे; प्रगति-दर्शक असा तो टप्पा आहे. स्वतःची वास्तू स्वतःचे हिंमतीवर उभारणे ही लौकिक अर्थाने अभिमानाची व कौतुकाची बाब मानली जाते. त्यातही हे यश लवकर गाठता आले तर त्याचे मोल अधिक असते. कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही महाराष्ट्रात सर्वात शेवटी रजिस्टर झालेली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक होय. असे असून कोकणात सर्वात प्रथम स्वतःची इमारत उभारण्याचे श्रेय या बँकेने मिळविले. कोकणाच्या अस्मितेस ही गोष्ट निश्चितच दिलासा देणारी ठरेल.

बँकेच्या अस्तित्वापासून आतापर्यंत बँकेच्या रचनेत, जडणघडणीत व पुढील कार्यात अनेक व्यक्तींचे, संस्थांचे व परिस्थितिजन्य घटनांचे जे सुयोग्य सहकार्य घडून आले त्याचाच परिणाम म्हणून ही बँक जिल्ह्यात आज अत्यंत उपयुक्त असे कार्य करून राहिली आहे. एरव्ही, कुलाबासारख्या कोकणातील सहकारी चळवळीचे दृष्टीने व साधन संपत्तीच्या अभावाने मागासलेल्या गणल्या जाणाऱ्या जिल्ह्याला स्वतःची मध्यवर्ती सहकारी बँक असावी ही कल्पना सुरवातीस अशक्यप्राय समजली जात होती. परंतु जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्त्यांची जिद्द एवढी की, त्यांनी या प्रतिकूल परिस्थितीशी मुकाबला करण्याचा चंग बांधला. बँक दिनांक ३०-९-६० ला रजिस्टर झाली. २ आक्टोबर, १९६१ ला महात्मा गांधी जयंतीचे मुहूर्तावर बँकेचे औपचारिक उद्‌घाटन झाले.

### बँकेची आजची परिस्थिती

सभासद :–

| | | |
|---|---|---|
| व्यक्ती | – | ३४९. |
| संस्था | – | ७९५. |
| संचालक मंडळ सभासद | – | २१. |

भाग भांडवल :–

| | |
|---|---|
| व्यक्तिगत | – रु. ३१,०००. |
| संस्था | – रु. १८,९२,०००. |
| सरकारी | – रु. १७,५०,०००. |
| निधी | – रु. ६,‥३,०००. |
| ठेवी | – रु. १,४१,२४,००० चे वर. |
| बाहेरील कर्जे :– | – रु. ८६,००,००० चे वर. |
| दिलेली कर्जे :– | |
| शेतकी | – रु. १,५०,००,००० चे वर. |
| बिगरशेतकी | – रु. ७६,६०, ०० चे वर. |
| व्यक्तिगत | – रु. ४७,००० चे वर. |
| गुंतवणुकी :– | – रु. ४४,५०,००० चे वर. |
| शाखा :– | २१. |
| सेवक वर्ग :– | २३५. |

आज संचालक मंडळ २१ सदस्यांचे आहे, ते संपूर्ण प्रातिनिधिक आहे. जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या सर्व घटकांस योग्य प्रमाणात बँकेवर प्रतिनिधित्व आहे व म्हणून संबंधितांचे हितसंबंध सांभाळले जातात. बँकेच्या संचालकमंडळाने निर्माण केलेल्या प्रथा अत्यंत उच्च दर्जाच्या आहेत. कोरमअभावी सभा तहकूब झाल्याची घटना जशी बँकेच्या इतिहासात नाही तसेच धोरणाचे बाबतीत मतभेद झाल्याची घटनाही संचालक मंडळाचे सभात घडलेली नाही. बँकेच्या कार्यात संचालक मंडळाचे सदस्यांना वाटणारी आत्मीयता व जिल्ह्यातील परिस्थितीचे त्यांना असणारे सम्यक् ज्ञान या गोष्टींचे हे निदर्शक आहे.

बँकेच्या नव्या इमारतीच्या उद्‌घाटनाचे शुभप्रसंगी आम्ही आमच्या शुभेच्छा व्यक्त करतो.

---

### बेकारांची संख्या वाढत चालली

काम शोधणाऱ्या लोकांच्या संख्येत भर पडत चालल्याने आणि आर्थिक विकासाचा वेग मंदावल्याने देशातील बेकारांची संख्या फुगत चालली आहे. गेल्या १५ वर्षात आर्थिक विकासाच्या योजना अमलात आणण्यात आल्यामुळे ३ कोटी अधिक रोजगार निर्माण करण्यात आले. परंतु ह्याच कालखंडात रोजगार शोधणाऱ्या लोकांच्या संख्येत ३८ कोटी लोकांची भर पडली. त्यामुळे परिस्थितीत सुधारणा झाली नाही. येत्या १० वर्षात ५·३ कोटी अधिक लोक रोजगाराचा शोध करू लागतील. मग परिस्थिती अधिकच चिघळण्याचा धोका आहे. ग्रामीण भागात आजच १·६ ते १·८ कोटी लोक अर्धवेळ काम करीत आहेत. त्यांना पूर्ण वेळ काम पाहिजे आहे.

---

### हौशी प्रवाशात तरुणांचा भरणा अधिक

परदेशातून भारताला येणाऱ्या हौशी प्रवाशात तरुणांचे प्रमाण वाढत चालले असून ५० ची उमर गाठलेल्यांची संख्या कमी होऊ लागली आहे. १९६६ मध्ये भारतात आलेल्या हौशी प्रवाशांपैकी २४·६ टक्के प्रवासी ५० वर्षे वयाच्या पुढील होते. १९६७ साली हे प्रमाण थोडेसे उतरून २३·२ टक्क्यांवर आले. साधारणपणे असे आढळून आले आहे की, १३ ते ३० वर्षे वयाच्या लोकांची संख्या वाढत चालली आहे. १९६६ साली ह्या वयाच्या गटातील प्रवासी लोकांची संख्या ४०,८३४ होती ती १९६७ साली ४८,८४२ पर्यंत वाढली. तथापि, अमेरिकेतून येणाऱ्या पर्यटकात मात्र ५० वर्षाच्या पुढील पर्यटकांची संख्याच अधिक होती. १९६६ मधील पर्यटकांची संख्या १ लाख, ५९ हजार होती ती १९६७ साली १ लाख, ७९ हजारापर्यंत गेली. परदेशी प्रवासी भारतात येण्यासाठी हिंवाळा अधिक पसंत करतात. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात सर्वात अधिक प्रवासी आले. जमिनीच्या मार्गाने येणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक होत आहे. १९६६ साली १,५२८ प्रवासी खुष्कीच्या मार्गाने आले. त्यांची संख्या १९६७ साली ७,४५२ पर्यंत वाढली. तरी सुद्धा ८२ टक्के प्रवासी हवाई मार्गाने येणेच पसंत करतात. अमेरिकेतून येणाऱ्या प्रवाशांची संख्या सर्वात अधिक आहे. एकूण प्रवाशांपैकी २५ टक्के प्रवासी अमेरिकन होते. त्यानंतर ब्रिटनचा व सीलोनचा अनुक्रम लागतो. सामान्यपणे पुरुष प्रवाशांची संख्या स्त्री प्रवाशांपेक्षा अधिक होती. पुरुष प्रवाशांची टक्केवारी ६१·७ व स्त्रियांची ३४·२ अशी होती. त्यातही उत्तर अमेरिकेतून येणाऱ्या खर्चिक प्रवाशात स्त्रियांचे प्रमाण अधिक म्हणजे ४२·९ टक्के होते. अमेरिकेच्या सधनतेचा हा प्रभाव असावा.

### आर्थिक शास्त्रासाठी नवे नोबेल पारितोषिक

जगातील सर्वात जुनी मध्यवर्ती बँक, स्वीडनची रिक्स बँक, हिने आपला त्रिशतक सांवत्सरिक उत्सव नुकताच साजरा केला. त्या निमित्त बँकेने नोबेल पारितोषिकाइतकेच (५० हजार डॉलर= ३,७५,००० रुपये) वार्षिक पारितोषिक देण्यासाठी पैसे दिले आहेत. स्वीडिश अॅकॅडेमी ऑफ सायन्सेस हे बक्षीस दरसाल देईल. त्याला नोबेल प्राईझ असे न म्हणता, "आल्फ्रेड नोबेलच्या स्मरणार्थ आर्थिक शास्त्रासाठी बक्षीस" असे संबोधिले जाईल. डायनामाइटचा संशोधक, आल्फ्रेड नोबेल ह्याने विज्ञानशास्त्र, वैद्यकशास्त्र, रसायनशास्त्र, साहित्य आणि शांतता ह्यासाठी बक्षिसे ठेविलेली आहेत, हे सुप्रसिद्धच आहे.

### कुटुंबनियोजनावरील खर्च

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून आतापर्यंत कुटुंबनियोजनावर ६७·२० कोटी रु. खर्च झाले आहेत. त्यापैकी ४२·३९ लक्ष रुपयांचा विनियोग परदेशांतून संततिप्रतिबंधक साधनांच्या आयातीवर झाला.

### नेहरूंची ध्वनिमुद्रित भाषणे

आकाशवाणीजवळ पं. जवाहरलाल नेहरूंची ध्वनिमुद्रित केलेली भाषणे आहेत, ती ८०० तास ध्वनिक्षेपणाला पुरतील. हे टेप एका एअरकंडिशण्ड खोलीत ठेवण्यात आले आहेत.

### किंमत सांगण्यासाठी मुदतवाढीची याचना

भारताकडून दरसाल १०,००० रेल्वे वॅगन्स घेण्याची तयारी रशियाने दाखविली आहे. त्यांच्या किंमतीचा अंदाज देण्यासाठी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने दोन महिन्यांची मुदतवाढ मागितली आहे.

### बँकांच्या सर्व्हिस चार्जेसमध्ये दुरुस्ती

व्यापारी बँकांनी २ मे, १९६८ पासून आपले सर्व्हिस चार्जेस वाढविले आहेत. त्यात दुरुस्ती करण्याची बँकांनी तयारी दर्शविली आहे.

### मुंबईमधील फेरीवाले

मुंबईमधील वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या लायसेन्सधारी फेरीवाल्यांची संख्या ८२,००० आहे. १९६३ साली ती संख्या ५२,००० होती. म्हणजे, दरसाल ५०० ची भर पडत आहे. प्रत्येक लायसेन्सला दरमहा १० रु. पडतात. लायसेन्स नसताही फेरीवाल्याचा धंदा करणारे ७५,००० ते १,००,००० फेरीवाले आहेत, ते वेगळेच.

### बँक ठेवीदारांची संघटना

ऑल इंडिया बँक डिपॉझिटर्स असोसिएशनची मुख्य कचेरी कलकत्ता येथे आहे. असोसिएशनच्या मुंबई शाखेचे उद्घाटन श्री. मुरारजी वैद्य ह्यांनी नुकतेच केले. देशातील १·२ कोटी ठेवीदारांची संघटना करून, ठेवीदारांना त्यांच्या ठेवीच्या योग्य गुंतवणुकीचे बाबतीत मतप्रदर्शनास वाव निर्माण करणे, हा ह्या असोसिएशनचा उद्देश आहे.

### गंगा-यमुनेचा नवा संगम

गंगा आणि यमुना ह्या नद्यांचा आणखी एक संगम होणार आहे. त्या नद्यांना जोडणारा एक कालवा खोदून गंगेचे पाणी यमुनेत सोडले जाईल. त्यामुळे यमुनेच्या पाण्यात भर पडून दिल्लीचा पाणीपुरवठा वाढेल. १९७२ नंतर हे काम हाती घेतले जाईल.

### हिंदी चित्रपटांची परदेशी हुंडणावळीची कमाई

१९६७ च्या पहिल्या ११ महिन्यांत हिंदी चित्रपटांनी ३·१ कोटी रु. ची परदेशी चलनाची कमाई केली. मलेशिया आणि सिंगापूर येथे त्यांची निर्गत वाढविण्याचा कसून प्रयत्न चालू आहे.


## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्सचे अभिनंदन

महाराष्ट्रातील व्यापारी शिक्षण प्रसाराचे आद्य प्रवर्तक कै. प्रा. ग. कृ. भोपटकर यांनी स्थापन केलेल्या डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स या महाराष्ट्रातील नामवंत व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षण संस्थेला १ जून, १९६८ रोजी ५० वर्षे पुरी होत असून संस्था ५१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. संस्था निरनिराळ्या व्यापारी व सहकारी डिप्लोमा परीक्षांकरिता विद्यार्थी तयार करते. अभ्यासक्रम एस्. एस्. सी. नंतर १ ते २ वर्षांचा असतो. सन १९५८ पासून संस्था पुणे विद्यापीठाच्या बी. कॉम्. पदवी परीक्षेकरिता नोकरी व्यवसाय करून बहिःस्थ (एक्स्टर्नल) म्हणून बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असून आजपर्यंत अनेक पदवीधर संस्थेतून बाहेर पडले आहेत. २६ जानेवारी १९६८ पासून संस्थेने देशाच्या वाढत्या औद्योगीकरणाला उपयुक्त असा "इंडस्ट्रीयल इंजिनियरिंग व मॅनेजमेंट" असा एक अभिनव शिक्षणक्रम सुरू केला आहे.

संस्थेतून आतापावेतो सुमारे वीस हजारांवर विद्यार्थी-विद्यार्थिनी बाहेर पडले असून त्यातील अनेकांनीं व्यापारी व औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थेने समाजातील गरीब, होतकरू, नोकरी-व्यवसाय सांभाळून ज्ञानार्जन करणाऱ्या, स्वतंत्र व्यवसायात पदार्पण करू इच्छिणाऱ्या अशा अनेक तरुणांना प्रसंगी जरूर त्या शैक्षणिक सवलती देऊन मार्गदर्शन करून प्रगतीपथावर नेले आहे. संस्थेला इतर शिक्षण-संस्थांप्रमाणे सरकारी वार्षिक अनुदान सरकारी नियमातील जरूर त्या तरतूदी अभावी मिळत नसल्याने संस्थेतील कार्यकर्त्यांना स्वार्थत्यागपूर्वक अविश्रांत श्रम करावे लागतात.

संस्थेने गेली ५० वर्षे व्यापारी, व्यावसायिक व व्यवस्थापकीय शिक्षणप्रसाराचे राष्ट्रकार्य सातत्याने, चिकाटीने व यशस्वीपणे चालवून महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीस हातभार लावला आहे. अवघ्या ३ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या संस्थेत आज अकराशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे शिक्षणकार्य विस्तृत व भरीव प्रमाणावर करण्याच्या दृष्टीने संस्थाचालकांचे प्रयत्न सुरू आहेत.

उत्कृष्ट व्यवस्थापकीय शासनानेच व्यापार-उद्योगाची वृद्धी होईल अशी संस्थाचालकांची श्रद्धा आहे. यासाठी तांत्रिक, औद्योगिक व शेतकी शिक्षणाबरोबरच व्यवस्थापकीय व व्यापारी शिक्षण अत्यावश्यक आहे, म्हणून डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स या संस्थेचा सुवर्णमहोत्सव नुसत्या संस्थाचालकांनाच नव्हे तर पुण्याच्या व महाराष्ट्राच्या दृष्टीने अभिमानाची व प्रशंसनीय ऐतिहासिक घटना आहे. संस्थेला सुवर्णमहोत्सवाचे प्रसंगी महाराष्ट्रीय कारखानदारांकडून भरपूर आर्थिक साहाय्य लाभो आणि संस्थेचे स्थैर्य वाढून तिचे नवेनवे उपक्रम यशस्वी होवोत असे आम्ही चिंतितो.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्



१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.
शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)



उत्पादक -
भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

### चोरटा व्यापार थांबविण्यासाठी कडक उपाय

परदेशांतून भारतात चोरट्या मार्गाने होणारी आयात थांबविण्यासाठी, निदान ती कमी करण्यासाठी कडक, उपाय योजण्याचा विचार मध्यवर्ती सरकारचे अर्थखाते करीत आहे. चोरटा व्यापार करणाऱ्यांना कडक शासन देण्याच्या दृष्टीने कायदेशीर तरतूद करण्यात येणार आहे. जे व्यापारी परदेशी वस्तूंचा व्यापार करतात त्यांना एक रजिस्टर ठेवण्याची सक्ती करण्यात येईल आणि त्यात वस्तू कशा व कोठून मिळविल्या त्याची नोंद करावी लागेल. ह्याबाबत पुरावा देण्याची जबाबदारी त्यांच्यावरच टाकण्यात येईल. त्याबरोबरच कायद्याच्या अंमलबजावणीची अधिक चोख व्यवस्था करण्यात येईल. त्यासाठी टेहळणी करणारी विमाने आणि नदीत चालणाऱ्या बोटी मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

### आगगाड्या थांबविण्यासाठी येणारा खर्च

मध्यरेल्वेच्या अधिकाऱ्यांनी एक पत्रक काढून ग्रामीण भागांतील लोकांनी आपल्या सोयीसाठी अधिक स्टेशनांवर आगगाडी थांबविण्याच्या मागण्या करू नयेत असे सुचविले आहे. दूर अंतराचा प्रवास करणाऱ्या गाड्या कमीत कमी स्टेशनांवर थांबविण्याचे धोरण असते. परंतु त्यामुळे ग्रामीण भागांतील लोकांना ह्या गाड्यांचा फारसा उपयोग होत नाही. गाडी पकडण्यासाठी त्यांना दूरवर प्रवास करावा लागतो आणि गाडीतून उतरल्यावर स्वतःच्या गावी जाण्यासाठीही लांबचा मार्ग घ्यावा लागतो. त्यामुळे अधिकाधिक स्टेशनांवर गाड्या उभ्या करण्याच्या मागण्या त्यांच्याकडून येत आहेत. एका स्टेशनवर गाडी उभी करून ती पुन्हा चालू करण्यासाठी रेल्वेखात्याला २० रुपये खर्च येतो. अशा रीतीने रोज ४ अधिक ठिकाणी गाड्या थांबविण्याच्या झाल्यास रेल्वेला दरसाल २५ हजार रुपये अधिक खर्च येईल.

### "आमचे खनिज लोखंड आणखी घ्या"

जपानी पोलाद कारखाने सध्या भारताच्या मिनरल्स अँड मेटल्स ट्रेडिंग कॉर्पोरेशनकडून १·१ कोटी टन खनिज लोखंड घेतात; १९७१-७२ पर्यंत त्यांनी ही खरेदी २·५ कोटी टनांपर्यंत न्यावी, अशी कॉर्पोरेशनची मागणी आहे. जपानने गेल्या वर्षी ६ कोटी टन खजिन लोखंड आयात केले; १९७१-७२ पर्यंत त्याची ही आयात ८ कोटी टनांवर जाईल. कोणत्याच एका देशावर अवलंबून राहावे लागू नये ह्यासाठी जपान अनेक देशांकडून आयात करतो. त्यामुळे, भारताच्या वाट्याला १·६ कोटी टनापेक्षा जास्त निर्गत येण्याचा संभव नाही. भारताला ऑस्ट्रेलियाच्या खाणींच्या स्पर्धेची भीती वाटत आहे.

### मेघालय

आसामच्या पुनर्घटनेतून निर्माण होणाऱ्या स्वायत्त डोंगरी प्रदेशाच्या राज्याला 'मेघालय' हे नाव दिले जाईल.

### भारतात आलेले परदेशी प्रवासी

१९६७ मध्ये भारतात १,७९,००० परदेशी प्रवासी आले. १९६६ च्या मानाने ही संख्या १२½% जास्त आहे. अमेरिकेतून सर्वांत जास्त म्हणजे ४३,००० आले. त्याखालोखाल ग्रेटब्रिटन ( २७,००० ) व सिलोन ( २०,००० ) ह्यांचा अनुक्रम लागतो.

### बिटापासून साखर करण्याचा यशस्वी प्रयोग

राजस्थानातील गंगानगर शुगर मिल्सने बिटापासून ५६५ क्विंटल साखर तयार केली आहे. उसाला होणाऱ्या रोगराईमुळे उसाऐवजी बिटाची लागवड करून त्याची साखर बनविण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. त्यामुळे बिटाची ह्या क्षेत्रात लागवड वाढण्याचा रंग दिसतो.

### टाटांच्या खतकारखान्यास विरोध

गुजरातमध्ये १६६ कोटी रु. ची खतकारखान्याची टाटांची योजना नियोजन मंडळास पसंत नाही. ह्या योजनेमुळे काही थोड्यांच्या हाती संपत्ती केंद्रित होईल, असा नियोजन मंडळाचा आक्षेप आहे. तथापि, उपपंतप्रधान मुरारजी देसाई आणि गुजरात सरकार ह्यांना टाटांची योजना हवी आहे.

### भेसळीचा धंदा तेजीत

मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य खात्याच्या एका तपासणीप्रमाणे, अन्नपदार्थांतील भेसळीचे प्रमाण १९६५ मध्ये १६·९% होते, ते आता ५१·३% वर पोचले आहे. ह्याचा अर्थ, आपण खातो त्या अन्नात निम्मी भेसळ असते! प्रिव्हेन्शन ऑफ फूड ॲडल्टरेशन कायदा अस्तित्वात आहे. पण त्याचा प्रभाव कुठेच दिसत नाही आणि भेसळ करण्याचा धंदा तेजीत आहे.

### पश्चिम किनाऱ्यावरील रस्ता १९७० मध्ये पूर्ण

भारताच्या पश्चिम किनाऱ्याने जाणारा मुंबई ते कन्याकुमारी हा राजरस्ता १९७० च्या अखेरीस पूर्ण होईल अशी माहिती मध्यवर्ती सरकारचे वाहतूकमंत्री डॉ. राव ह्यांनी दिली आहे.

### चित्रपट निर्मात्यांना कर्जे

फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनने आतापर्यंत चित्रपट निर्मात्यांच्या एकूण ५७ चित्रपटांसाठी मिळून १३६ लक्ष रुपयांची कर्जे दिली आहेत. फेब्रुवारी, १९६८ अखेर १०६ लक्ष रुपयांची परतफेड व्हायला हवी होती; ६४ लक्ष रुपयांची परतफेड वेळेवर झाली.

### एलिझाबेथची २२·८ लक्ष रु. ची अंगठी

ब्रिस्टल टेलिव्हिजन स्टुडिओत एलिझाबेथ टेलर ३३ कॅरट हिऱ्याची, गलच्या अंड्याच्या आकाराची अंगठी घालून गेली, तिची किंमत २२·८ लक्ष रु. आहे. न्यूयॉर्क येथील एका लिलावात तिच्या पतीने ( रिचर्ड बर्टनने ) ती हिऱ्याची अंगठी विकत घेतली. एका खाजगी जेट विमानातून ती सशस्त्र पहाऱ्यांत इंग्लंडला आणण्यात आली.

## पाद्र्यांच्या परवान्यांची मुदत वाढणार नाही

परदेशांतून भारतात आलेल्या खिश्चन पाद्र्यांना ह्या देशात राहण्यासाठी परवाने घ्यावे लागतात. अशा परवान्यांचे वेळोवेळी नूतनीकरण करण्यात येते. परंतु, भारत सरकारने परदेशीय धर्मोपदेशकांच्या परवान्यांची मुदत न वाढविण्याचा निर्णय आता घेतला आहे. महाराष्ट्रातील मनमाड भागात काम करणारा स्पॅनिश मिशनरी फादर फेरर ह्याच्या वर्तणुकीमुळे सध्या मिशनऱ्यांविरुद्ध बरेच वादळ उठलेले आहे. हे धर्मोपदेशक जे काम करतात तेच काम भारतामधील धर्मोपदेशकांनाही करता येण्यासारखे आहे, अशी भूमिका सरकारने घेतली आहे. तथापि, हे कारण सांगण्यापुरते असण्याचाच संभव आहे. खरी परिस्थिती अशी आहे की हे पाद्री लोक सामाजिक आणि शैक्षणिक सेवा करण्याच्या मिषाने आपआपल्या सरकारची सूक्ष्मसूक्ष्म कामे करीत असतात अशा अनेक तक्रारी सरकारकडे करण्यात आल्या आहेत. ह्या प्रकरणात एक गोष्ट मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहे. परदेशीय धर्मोपदेशकांच्या कार्याचे क्षेत्र बहुधा भारताच्या सरहद्दीजवळील प्रदेशांत आढळून येते. त्या प्रदेशातील त्यांच्या कारवायांमुळे भारत सरकारची परिस्थिती अतिशय अडचणीची होऊन बसते. परदेशीय धर्मोपदेशक देशांतील मागासलेल्या जमातींच्या दारिद्र्याचा व अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना बाटविण्याच्या कारवाया करतात अशी लोकांची रास्त समजूत झालेली आहे. भारतात सध्या ४ हजार परदेशीय धर्मोपदेशक आहेत. त्यांच्यापैकी ३०० जणांचे परवाने ह्या वर्षी मुदतीच्या बाहेर जाणार आहेत. नंतर मुदत वाढविण्यात येण्याची शक्यता नाही. तथापि, ज्या उपदेशकांची तांत्रिक अगर इतर कारणांसाठी गरज असेल त्यांच्या बाबतीत अपवाद केला जाईल.

---

## रेल्वेमार्गावरील फाटकांत होणारे अपघात

रेल्वेमार्गावर अनेक ठिकाणी रस्त्यावरून होणाऱ्या वाहतुकीची वाढ जात असते. त्या ठिकाणी बहुधा एखादा रक्षक असतो. पण तरी सुद्धा रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांची व रेल्वेची टक्कर होऊन अनेक अपघात दरसाल होत असतात. भारतात रेल्वेमार्गावरील फाटकांची संख्या सुमारे ३९,९०० आहे. पण, त्यापैकी २० हजारांवर फाटकांची उघडझाप करण्यासाठी माणूसच नसतो. अशा ठिकाणी रेल्वेमार्गावरून जाणारे अगर खालून जाणारे भुयारी मार्ग तयार करण्याचे रेल्वेचे धोरण आहे. निदान रेल्वेमार्गावरून जाणाऱ्या रस्त्यांवर रक्षक तरी ठेवण्यात येणार आहेत. १९६६-६७ सालात वरून जाणारे अवघे ८ पूल बांधण्यात आले व १५७ ठिकाणी रक्षकांची योजना करण्यात आली.

---

## राजकीय पक्षांना देणग्या : फक्त कंपन्यांवरच उपाययोजना का ?

राजकीय पक्षांना देणग्या देण्यास कंपन्यांना बंदी करणारे सरकारी बिल म्हणजे सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार कमी करण्याचे पहिले पाऊल म्हटले पाहिजे. कंपन्या जेव्हा अशा देणग्या देतात, तेव्हा त्यांचा हेतू लायसेन्स मिळविणे, सरकारी कर्जे मिळविणे, परतफेडीस मुदती मिळविणे, इत्यादी थोडाफार असतोच, आणि अगदी शुद्ध हेतूने त्या देणग्या दिल्या जातात असे जरी मानले, तरी भागदारांच्या पैशाचा तो अप्रस्तुत वापर ठरतो. निवडणुकासाठी परदेशांनी पुरविलेल्या पैशाचा वापर करणे हे तर लोकशाहीस फारच घातक ठरते आणि निवडणुकांसाठी सर्वच अप्रस्तुत मार्गाने मिळणाऱ्या सर्वच पैशावर बंदी घातली गेली पाहिजे हे उघड आहे. फक्त कंपन्यांनाच अशी बंदी करण्यात आली, तर ती घटनेच्या १४ व्या कलमाला धरून होणार नाही, असे मत व्यक्त केले जात आहे. सोसायट्या, सहकारी पतपेढ्या, ट्रस्ट, कामगार संघ, इत्यादी अशा बंदीतून का वगळले जावेत ? त्यांनाही समाविष्ट करणारे व्यापक बिल तयार करण्याची आवश्यकता प्रतिपादिली जात आहे. त्याला वेळ लागेल, म्हणून त्यासंबंधातील कायदे आधी जरुरीप्रमाणे बदलण्यात यावेत, असे सुचविण्यात येत आहे. फक्त कंपन्यांनाच बंदी करणारे बिल अवैध ठरले जाण्याची शक्यता आहे. फक्त कंपन्यांनीच काय घोडे मारले आहे ?

---


## M. E. S. College of Commerce, Poona 4.

**Opens** for the new academic year on 15th June 1968.

**Offers Courses** leading upto B. Com. Degree with Advanced Accounting, Advanced Costing and Industrial Management as the special subjects.

**Insists** on personal attention, Collective discipline, extra-curricular activities and best examination results. The results of F. Y. B. Com. Examination of March 1968 is 71%.

**Gives** all possible help to every deserving poor student, irrespective of caste and creed.

**Prospectus** with application form will be ready by 25th May 1968 and can be available on remittance of 50 Paise in Postal stamps. Admissions will start as soon as the S. S. C. results are out.

**The students of this college are advised to enroll themselves, in F. Y., S. Y., and T. Y. classes as soon as they know their success in the university examinations results.**

Date : 17-5-1968.

S. W. Chirmulay,
*Principal.*

## परदेशी प्रवाशांचा भारताविषयी कटु अनुभव

ट्रॅव्हल रिसर्च इंटर नॅशनल इन्कॉर्पोरेटेडने केलेल्या पाहणीत, परदेशी प्रवाशांच्या दृष्टीने भारताची निकृष्टता सिद्ध झाली आहे. एकूण २६ पौर्वात्य देशांची पाहणी केली. त्यात अस्वच्छता व गलिच्छपणा, वाईट अन्न, धूळ, दारिद्र्य, वाईट हवा, इत्यादी बाबतीत भारताचा पहिला अनुक्रम लागतो. उद्धट व असहकारी लोकांचे बाबतीत भारताचा तिसरा अनुक्रम आहे. वैयक्तिक सुरक्षिततेचे बाबतीत भारताचा चवथा अनुक्रम आहे. चांगल्या अन्नाचे बाबतीत भारताचा १८ वा अनुक्रम लागतो. करमणुकीच्या सोईच्या बाबतीत भारताची गणना २२ वी आहे. आलेल्या परदेशी उतारूंपैकी ४९% उतारू पुन्हा येण्यास तयार होणार नाहीत; इतरांनाही 'भारतात जाऊ नका' असे सांगतील. अनुकूल आणि प्रतिकूल अशा सर्व बाबींचा विचार केला, तर भारत २६ देशांत २५ व्या जागी आहे. एकटा व्हिएटनामच फक्त भारताचा खाली आहे. भारताचे डायरेक्टर जनरल ऑफ टूरिझम, श्री. एस के रॉय, ह्यांना हे निष्कर्ष स्वाभाविकपणेच मान्य नाहीत. तथापि, त्यापासून पुष्कळ शिकण्याजोगे आहे, असे श्री. रॉय म्हणाले. पाहणीच्या अहवालाची प्रत प्रत्येक राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

## बंदूक वापरण्याच्या शिक्षणाबद्दल अनास्था

मुलकी नागरिकांना बंदूक वापरण्याचे शिक्षण देण्याची एक योजना भारत सरकारच्या गृहखात्यातर्फे १९५६ मध्ये सुरू करण्यात आली होती. ह्या योजनेबाबत लोकांनी—विशेषतः तरुणांनी—अनास्था दाखविल्यामुळे तिची प्रगती खुंटली आहे. ह्या शिक्षण योजनेचा काल अवघा १० दिवसांचाच होता, आणि तिचा फायदा घेण्यासाठी प्रत्येक नागरिकाला सुमारे दोन रु. खर्च यावा लागत होता. राज्य सरकारतर्फे शिक्षक, बंदुकी आणि त्या उडविण्याची ठिकाणे ह्यांची सोय करण्यात येत होती. तरीसुद्धा नागरिकांनी योजनेचा फायदा घेण्याचा उत्साह अल्प प्रमाणातच दाखविला. सुमारे २२ लाख लोक योजनेचा फायदा घेतील असा अंदाज होता; परंतु गेल्या १२ वर्षांत अवघ्या १ लाख, ८६ हजार लोकांनीच तिचा फायदा घेतला.

---

## जीवनावरील धर्माची छाप नष्ट होत चालली

नुकत्याच केलेल्या चाचणीप्रमाणे, प्रश्न विचारलेल्यांपैकी ६७% अमेरिकनांच्या मते अमेरिकन जीवनावरील धर्माची छाप नष्ट होत चालली आहे. ११ वर्षांपूर्वी, फक्त १४% लोकांना तसे वाटत होते.


—महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था—

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

संस्थापक : कै. प्रा. ग. कृ. भोपटकर : स्थापना—१९१८ : टेलिफोन नं. ५४९६०

**नवीन वर्षासाठी गुरुवार दि. २० जून १९६८ पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू होतील.**

### महत्त्वाचे अभ्यासक्रम

१. गव्हर्नमेंट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.) मुदत :—१ वर्ष, किमान पात्रता :—एस. एस. सी.
वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी. खास विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वर्ग

२. प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा किमान पात्रता :—इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस. एस. सी.
वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी.

३. प्री-डिग्री आर्ट्स एक्स्टर्नल परीक्षा किमान पात्रता—इंग्रजी घेऊन एस. एस. सी.
वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यमः—मराठी व इंग्रजी.

### इतर अभ्यासक्रम

बी. कॉम. पार्ट वन व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी व मराठी शार्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स, इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग व मॅनेजमेंट कोर्स, मार्केटिंग मॅनेजमेंट कोर्स, वगैरे.

प्रसिद्धिपत्रक : ३० पैसे

ए. जी. भोपटकर
एम्. कॉम., एलएल्. बी.


सदैव
सुंदर पोषाखात
राहण्यासाठी
ठाकरसीचे
everfresh
इतराचे लक्ष आपल्याकडे वेधून घेऊ इच्छिणारे लोक 'एव्हरफ्रेश' (६७% 'टेरीन', ३३% सुती धागा असलेले) कापडावर बेहद खूष आहेत. वॉश 'एन' वेअर-(धुवा नी वापरा) प्रकारच्या कापडातील सर्वोत्तम कापड-साधे अथवा प्रिन्टेड आणि चुणी-रोधक सुद्धा; म्हणूनच तर ते सदा सुंदर राहते-एव्हर फ्रेश।
तसेच १००% सुती कापड -
TEBILIZED
चुणी-रोधक गुणात कसोटी सिद्ध
आणि शर्टिंग, सूटिंग, स्क्रीन प्रिन्टस्, पॉपलीन, वायल कॅम्ब्रिक, जेकार्ड व खोलीचे वगैरे तऱ्हेतऱ्हेचे कापड
धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्स् कं. लि.
धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.
११, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१
ठाकरसी ग्रूप
सुंदर सुती कापडाचे उत्पादक
TM-100




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.